**1** अनुवाद Deut 33:12; लूक Luke 15:4-7 **(106-in song book)**
*यहोवाचाऽ प्रियकर त्याच्या खांद्यावर राहील, येशू ख्रिस्ताऽचा प्रियकर, त्याच्या भक्तित राहील ।धृ ।।*
*1 प्रीतिने शोऽधिले त्याने मला, हरवलेल्या मेंढराला,*
*प्राण देऊन विकत घेतले मला, भटकलेल्या पापी मानसाला*
*2 पश्चाताप करणाऱ्या पाप्याला, खांद्यावर प्रभू ठेवी त्याला,*
*म्हणे "माझ्यासोबत आनंद करा, माझे मेंढरू सापडले मला"*
*3 त्याला दिवसभर प्रभूऽ झाकतो, त्याच्या पंखांखाली आश्रय देतो,*
*आपल्या धार्मिकऽतेमध्ये लपवितो, जखमी कुशीत सुरक्षित ठेवितो*

**2** प्रकटीकरण Revelation 1:17,18 **(105-in song book)**
*मी त्याला पाहिले तेव्हां मी, मेल्यासारखा त्याच्या पायांजवळ पडलो,*
*त्यानें आपला उजवा हात माझ्यावर, ठेवून मला म्हटलें "भिऊं नको" मी त्याला पाहिले तेव्हां मी*
*1 जो पहिला व जो शेवटला, जो सदा जिवंत 'तो मी आहे 2*
*2 मी मेलो होतो तरी पाहा, सदासर्वकाळ मी जिवंत आहे 2*
*3 आणि मृतलोकाच्या व मरणाच्या, किल्ल्या माझ्या जवळ आहेत् 2*

**3** विलापगीत Lamentations 3:22-29 **(96, Eng9-in song book)**
*यहोवाची प्रेमदया! म्हणुन आम्ही, नष्ट झालो नाही, त्याच्या महाऽकरुऽणेत खंड, खंड पडत नाहीं*
*यहोवाची प्रेमदया! म्हणुन आम्ही ऽ ऽ ।।धृ ।।*
*1 त्याच्या करुऽणा थकत नाहीत, त्या रोज सकाऽळी नव्या होतात*
*2 तुझे विश्वाऽसूपण हे प्रभो, अत्यंत थोऽर महान आहे!*
*3 ख्रिस्तच माऽझा वतन भाग, आहे असेऽ माऽझा जीव म्हणतो*
*4 जो जीव ख्रिस्ताऽला शरण जातो, परमेश्वर त्याला प्रसन्न होतो*
*5 त्याच्या तारणाऽची मुकाट्यानें, वाट पाहाऽणें बरें आहे*
*6 आपल्या तारुऽण्यांत जूं वाहावें, हें मनुष्याऽला चांगले आहे*
*7 ते जूं यहोवाऽने ठेवले म्हणून, एकांतीं बऽसून उगें राहावें*
*8 आपले तोंड धुऽळींत हो ठेवावें, अशानें कऽदाऽचित आशा राहील*

**4** गीतरत्न Song of Solomon 1:4-5, 6:10, 8:5 **(17-in song book)**
*केदाराच्या डेऱ्यासारखी काळी, पण शलमोनाच्या पडद्यासारखी सुन्दर .2*
*अशी ही मंडळी, ख्रिस्ताची मंडळी, सन्तांची मंडळी आहे,*
*अशी ही मंडळी, ख्रिस्ताची मंडळी, भक्तांची मंडळी आहे*
*1 चंद्रासारखे तिचे लावण्य, सुर्यासारखे तिचे स्वच्छपण,2 अशी ही मंडळी, ख्रिस्ताची मंडळी ..*
*2 पुढे पाही प्रभातेप्रमाणे, झेंडे उभारी सेनेप्रमाणे .2 अशी ही मंडळी, ख्रिस्ताची मंडळी ..*
*3 ख्रिस्त वल्लभावर टेकून, चालली जगाच्या रानातुन .2 अशी ही मंडळी, ख्रिस्ताची मंडळी ..*
*4 सदा म्हणे 'ख्रिस्ता मज ओढ, म्हणजे आम्ही तुझ्यामागे धावूं ' 2, अशी ही मंडळी ख्रिस्ताची*

**5** यहेज्केल Ezekiel 36:26-27,31 **(22-in song book)**
*मी तुम्हांला, नवें ह्रदय देईन, तुमच्यामध्यें नवा आत्मा घालीन 2 . . . मी तुम्हांला ।।धृ ।।*
*1 पाषाणाचें ह्रदय तुमच्या, देहांतून दूर करीन 2 तुम्हांला मी नम्रतेचें 2 मांसाचें ह्रदय देईन ...*
*2 आणि मी आपला आत्मा तुमच्या,अन्तर्यामी घालीन 2 माझ्या नियमांमध्यें वागाल 2 असें मी करीन*
*3 आठवाल तुम्ही आपले दुराचार आणि दुष्कर्मे 2 घृणा स्वतःची येईल तुम्हां 2 आपल्या अधर्मामुळे*

**6** ईयोब Job 42:5-6 **(26-in song book)**
*आता माझा डोळा तुला पाहतो ऽऽ प्रभु माझा डोळा तुला पाहतो ऽऽ*
*म्हणून मी स्वत;ला तुच्छ लेखतो 2 आता माझा डोळा तुला पाहतो ।।धृ ।।*
*1 स्वतःला मी घृणित जाणून, धूळ व राख यांवर बसून 2 पश्चाताप करतोऽ, पश्चाताप करतो . आता*
*2 ख्रिस्तरहित धार्मिकता माझी, केवळ निर्बळ शक्ति माझी, बुध्दीहिन मी मानतो, बुध्दीहिन मी मानतो*

Brother Prem Waghmare, Purani Basti, WadDhamna, Nagpur 440023,Maharashtra, INDIA,
Ph 09421804920, Email:premw1@yahoo.com
U.S. Address: P.O.Box 9424, Kansas City, Missouri 64133-0224 (U.S.A.)

**7** स्तोत्र Psalms 127:1,2 **(43-in song book)**
*यहोवा जर घर बांधीत नाही, बांधणारे व्यर्थ श्रम करतात ।।धृ।।*
*यहोवा (जर) नगर राखीत नाही, पहारेकरी व्यर्थच जागा राहतो*
*1 तुमचे अति पहाटेंस उठणे, उशिराने विसावा घेणे, तुमचे झुंजुरका उठणे, उशिराने विसावा घेणे*
*कष्टाची भाकर खाणे, हे व्यर्थच आहे दुःखाची भाकर खाणे, हे व्यर्थच आहे*
*2 पहा आपल्या प्रिय जनांस, तो झोप, तृप्ती देतो, पहा आपल्या प्रिय जनांस, तो झोप, तृप्ती देतो*
*जे लागेल ते त्यांना, झोपेतहि तो देतो, जे लागेल ते त्यांना, झोपेतहि तो देतो*

**8** 1तिमथी 1Timothy 6:6-8, ईयोब Job 1:21 **(55-in song book)**
*चित्त–समाधानासह भक्ति, हा तर मोठाच लाभ आहे, संतोषासहित असलेली सुभक्ति,*
*हा तर मोठाच लाभ आहे, हा तर मोठाच लाभ आहे, ।।धृ।।*
*1 ख्रिस्तच तृप्ति, ख्रिस्ताची भक्ति, ख्रिस्तच तृप्ति, ख्रिस्ताची भक्ति*
*ही मोठीच मिळकत आहे, ही खरी मिळकत आहे 2*
*2 जगांत काहीच आणिले नाही, त्यातून नेता येत नाही 2*
*खाली हात परत जाईन, धन्य यहोवाचे नाम 2*
*3 खायला प्यायाला दिले, आश्रय स्थान दिले, अन्नपानी जे दिले, वस्त्र झाकायाला दिले*
*तेवढयाने तृप्त असावे, भक्तांनी प्रसन्न असावे 2*

**9** स्तोत्र Psalms 45:10,11 **(58-in song book)**
*अगे कन्ये देवाची मंडळी, ऐक विचार कर, आपला कान लाव 2 अगे कन्ये ।।धृ।।*
*1 तूं आपले लोक, बापाचे घर ही विसर 2 अशाने तुझ्या सौदर्याची, राजा आवड धरील 2*
*2 तो तुझा प्रभु आहे, ख्रिस्त तुझा पति आहे 2 त्याला नमन कर, त्याच्या चरणी लाग 2*

**10** यशया Isaiah 66:1,2 प्रेषित Acts 7:48-50 **(66-in song book)**
*परम प्रधान, हातांनी बांधलेल्या, घरांत राहत नाहीं ।।धृ।।*
*1 आकाश माझे राजासन आहे, पृथ्वी पायाचे आसन आहे,*
*प्रभु यहोवा असे म्हणतो, प्रभु परमेश्वर म्हणतो*
*2 माझ्यासाठी कसले घर बांधाल?, माझ्या विसाव्याचे कोणते ठिकाण आहे?*
*हे सर्व पदार्थ मी केले नाहीत काय? माझ्या हाताने हे सर्व केले नाहीत काय?*
*3 जो शोकित आत्म्याचा आणि दीन, अशा मनुष्याकडे मी पाहीन*
*वचन ऐकुन थरथर कांपतो, माझ्या वचनाने कम्पित होतो*
*4 ताठ मानेचे, कृपारहित लोक हो, हृदयाची सुंतारहित लोक हो,*
*आत्म्याला तुम्ही अडवता, सदा, पवित्र आत्म्याला अडवता*

**11** स्तोत्र Psalms 84:4,5,7; रोम Rom 12:1 **(37-in song book)**
*तुझीया घरांत जे राहतात, तुझ्या वचनात जे राहतात, आहेत ते सुखी, खरोखर आहेत ते सुखी ।।धृ।।*
*1 निरंतर तुझी, स्तुति करतात, जीवंत देवा, तुझी भक्ति करतात*
*आहेत ते सुखी खरोखर, आहेत ते सुखी*
*2 ज्याचे सामर्थ्य, तुझ्यांतच आहे, सीयोनाचे हृदयात, राजमार्ग आहेत*
*तो आहे खरा सुखी तुझ्यामध्यें, तो आहे खरा सुखी*
*3 शक्तीवर शक्ती ते, पावत जातात, त्यातला प्रत्येक, हजर सीयोनांत*
*देवा समोर राहतो येशू देवा, तुझ्या समोर राहतो*

**12** स्तोत्र Psalm 92:10,1,2, 12-14 **(44-in song book)**
*जसे रानबैलाचे शिंग, तसे माझे शिंग, तू उंच केले आहे, तू उंच केले आहे*
*ताज्या तेलाने मला, ताज्या तेलाने मला, अभिषेक झाला आहे, अभिषेक झाला आहे ।।धृ।।*
*1 यहोवाची उपकारस्तुती करणे, तुझ्या नावाला स्तुती गाणे, परात्परा उत्तम आहे*
*2 तुझी प्रेमदया प्रतिसकाळी, प्रगट करणे सत्य प्रतिरात्री, गंभीर शब्दाने स्तुती उत्तम आहे*
*3 न्यायी खजुरीच्या झाडासारखा, लबानोनातील गंधसरु सारखा, टवटवेल आणि वाढेल*
*4 यहोवाच्या घरात रोपलेले, अंगनात भरभराट पावतील, म्हातारपणीही फळ देत जातील*